

# महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती

कॉ. भालचंद्र कांगो



# महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती

# महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती

कॉ. डॉ. भालचंद्र कानगो

**दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट**
**अन्नपूर्णा परिवार**

सुवास्तू प्रेस्टिज, आदित्य गार्डन सिटीजवळ, मेघमल्हार सोसायटी शेजारी,
आर.एम.डी. इन्स्टिट्यूटच्या मागे, मुंबई-गोवा हायवेजवळ,
वारजे, पुणे - ४११०५८

E-mail : ammco-ordinatorpune@annapurnapariwar.org
ammco-ordinatormumbai@annapurnapariwar.org

Website : www.annapurnapariwar.org

किंडल आवृत्ती वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
मो. : ९३७२७१५४२१, ९९२२९६७०००

किंमत : ₹ ६०/-

# महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती

**लेखक :** कॉ. डॉ. भालचंद्र कानगो

मुखपृष्ठ : रुचा पाटील

**किंमत : ₹ ६०/-**

**प्रकाशक**
**डॉ. मेधा पुरव सामंत**
**दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट अन्नपूर्णा परिवार**
सुवास्तू प्रेस्टिज, आदित्य गार्डन सिटीजवळ, मेघमल्हार सोसायटी शेजारी,
आर.एम.डी. इन्स्टिट्यूटच्या मागे, मुंबई-गोवा हायवेजवळ,
वारजे, पुणे - ४११०५८

**मुद्रणस्थळ**
अंजूम बाइंडिंग वर्क्स, हमीद शेठचा गाळा, मेसेंट रोड, फ्रि वे समोर,
खांब क्र. २००, शिवडी (पू.), मुंबई - ४०००१५, दूरध्वनी : २४९८५२९०

# प्रकाशकाचे दोन शब्द



अन्नपूर्णा परिवार अंतर्गत असलेल्या कॉ. दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिग इन्स्टिट्यूट तर्फे संस्थापक दिनानिमित्त ''महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती'' ही डॉ. कॉ. भालचंद्र कानगो यांनी लिहिलेली पुस्तिका प्रसिद्ध करताना आनंद होत आहे.

अन्नपूर्णा परिवाराचे संस्थापक कॉ. दादा पुरव आणि पद्मश्री प्रेमाताई पुरव या दोघांनी मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी झालेल्या लढ्यात सक्रीय सहभाग घेतला होता. एक भाषिक संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला ६० वर्षे पूर्ण झाली आहेत. याचे औचित्य साधून ''महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती'' ही पुस्तिका लिहण्याची विनंती आम्ही डॉ. भालचंद्र कानगो यांना केली.

मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र झाला. पण अद्याप महाराष्ट्र आणि कर्नाटक यांतील सीमा प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे बेळगांवचे प्रा. कॉ. आनंद मेणसे यांनी सीमा लढ्या वरील लिहिलेले **''संघर्ष - महाराष्ट्रात विलीन होण्यासाठी''** हे पुस्तक सुद्धा या संस्थापक दिनानिमित्त प्रसिद्ध करीत आहोत.

मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र झाला परंतु समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्राचे स्वप्न साकार झालेले नाही.

किंबहुना कॉर्पोरेट भांडवलशाहीचा विळखा मुंबई महाराष्ट्राच्या आर्थिक सामाजिक शैक्षणिक - सांस्कृतिक जीवनावर अधिक घट्ट झाला आहे त्याचे विश्लेषण  कॉ. कानगो यांनी या छोट्या पुस्तिकेत केले आहे.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्र राज्याचे स्फूर्तीस्थान आहे.

शाहू, फुले, आंबेडकर, मार्क्स यांच्या विचाराची परंपरा महाराष्ट्र राज्यातील कष्टकरी चळवळीला आहे. त्यामुळे कृतीशील मार्क्सवादी विचारवंत असलेल्या डॉ. कानगो यांना ही पुस्तिका लिहण्याची विनंती आम्ही केली. चळवळीच्या इतर अनेक कामांत गुंतलेले असुन सुद्धा कॉ. कानगो यांनी **''महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती''** ही पुस्तिका लिहून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे शतशः आभारी आहोत.

**डॉ. मेधा पुरव-सामंत**

■

# महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती

कॉ. डॉ. भालचंद्र कानगो

कॉ. धोपेश्वरकर अन्नपूर्णाच्या डॉ. मेधा पुरव सामंत व विश्वस्तांनी महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती या विषयावर एक छोटेखानी पुस्तिका लिहिण्याची जवाबदारी माझ्यावर दिली. मी अर्थशास्त्राचा विद्यार्थी नाही. तसेच पुस्तिका लिहिण्यासाठी लागणारी आवश्यक असलेली शिस्त व अभ्यास यांचा ही अभाव मला जाणवला. हे सुरवातीलाच सांगणे आवश्यक आहे.

२०२० साली संयुक्त महाराष्ट्र निर्मितीला ६० वर्षे पुर्ण झाली. तसेच भारतीय स्वातंत्र्यालाही ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर संयोजकांनी जागतिक, भारतीय व महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था या संदर्भात मांडणी करण्यासाठी संकल्प केला आहे. तो प्रयत्न निश्चीतच स्वागतार्ह आहे.

देशांअंर्तगत प्रभावी असलेल्या खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण याच सुत्राला धरुन देशाची व राज्याची आर्थिक वाटचाल होत आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करतांना सर्व सामान्य जनतेच्या म्हणजे कष्टकरी जनतेच्या दृष्टिकोनातून अनेक समस्या समोर येत आहेत. त्याचा त्रोटक आढावा घेण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.

**जागतिकीकरण**

गेल्या २५०-३०० वर्षांपासून सगळ्या देशांची अर्थव्यवस्था जगतिकीकरणाकडे जात आहे. अर्थात हा प्रवास प्रदीघ काळ घेणारा आहे व त्यात अनेक अडथळे, अडचणी ही येत आहेत व येणार आहेत. मागच्या शतकात मोठी साम्राज्ये लयाला गेली व राष्ट्र निर्मितीची प्रक्रिया वेगाने पसरली. जवळपास १९१ राष्ट्रे आज अस्तित्वात आहेत यातील बहुतेक राष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था आज जागतिक

व्यापार संघटने मार्फत, नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व तसेच जागतिक कॉर्पोरेट भांडवलशाहीच्या दबावाखाली एकमेकांशी जोडल्या जात आहेत. जागतिक प्रभावाखाली येत आहेत. अर्थात या काळात प्रत्येक राष्ट्र आपापली अर्थ व्यवस्था मजबूत करण्यासाठी, स्व:ताची स्वयंपूर्णता कायम ठेवण्यासाठी व परावलंबीत्त्व कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. विशेषता १९३० ते १९८० या काळात ही प्रक्रिया जास्त मजबूतीने होत होती.

१९८० नंतर मात्र वेगवान बदलत्या तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन बहुराष्ट्रीय कंपन्या व विकसीत देशांनी सर्व जगावर आपली भूमिका व आर्थिक वर्चस्व लादले. १९८६ साली गॅट करार रद्द करून नवीन डंकल अहवाल आणून १९९५ सालापासून **'जागतिक व्यापार संघटनेची'** स्थापना करुन सर्व राष्ट्राच्या अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेला जोडण्याचा व अंकीत ठेवण्याचा प्रयत्न केला. या जागतिकीकरणामध्ये परदेशी भांडवलावर आधारलेला, त्याला मुक्त वाव देणारा व्यवहार वाढला. त्याचबरोबर उत्पादनेही प्रमुख्याने निर्यातीसाठी करावीत हा आग्रही पण वाढला. यासाठी आंतर राष्ट्रीय नाणे निधी, जागतिक बँक यांनीही कर्ज पुरवठा देतांना विविध राष्ट्रांवर अटी लादून त्यांची आर्थिक धोरणे या प्रक्रियेला मदत करतील याची व्यवस्था केली. याचा परिणाम १९८० नंतर सर्वत्र जाणवला.

भारताने १९९१ पासून नवीन आर्थिक धोरण व सुधारणा यांच्या नावाखाली ही नवीन धोरणे स्वीकारण्यास सुरवात केली. त्यामुळे राष्ट्राच्या अर्थ व्यवस्थेवर व राज्याच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला. प्रामुख्याने प्रत्येक राष्ट्राला तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यावर बंधने आली. आपल्या देशात तर केंन्द्र सरकारने आपली वित्तीय तुट ही ४ टक्यापेक्षा जास्त असू नये म्हणून कायदाच आणला. याचा परिणाम सरकारच्या भांडवल उभारणीवर झाला आणि भांडवलासाठी खाजगी व परदेशी भांडवल महत्वाचे ठरु लागले.

सरकारच्या लोककल्याणारी योजना व धोरणे राबविण्यावर मर्यादा आल्या त्याचा परिणाम राज्याच्या अर्थव्यस्थेवरही झालेला दिसतो. भारत जरी संघ राज्य असला तरी राज्य सरकारच्या स्वतंत्र आर्थिक भूमिका घेऊन वाटचाल करण्यावर मर्यादा आहेतच त्या नवीन जागतिकीकरणा नंतर आणखीनच वाढल्या विशेषता 'वस्तू व विक्री कर' यांच्यासाठी जीएसटी ची अमंलबजावणी सुरु झाल्या नंतर राज्याच्या भांडवल उभारणीवर व लोककल्याणकारी योजना राबविण्यावर मोठ्या मर्यादा आल्या आहेत. प्रामुख्याने केंन्द्राच्या मदतीनेच राज्य चालते. दुसरीकडे वाढत्या जागतिकीकरणाच्या रेट्यात केंन्द्र सरकार अनेक मर्यादाचे पालन करुन आर्थिक धोरण राबविते. केंन्द्र सरकार

जरी स्वतंत्र भारताचे सरकार असले तरी जागतिक अर्थव्यवस्थेशी भारताची अर्थव्यवस्था जोडलेली असल्यामुळे १९८० आधीची परिस्थीती व आजची परिस्थिती वेगळी आहे. याची जाणीव ठेवावी लागेल.

तुटीच्या अर्थसंकल्पामुळे चलन वाढ होते. चलन वाढीमुळे महागाई वाढते, खर्च वाढतो त्यामुळे महागाई आटोक्यात ठेवण्यासाठी तुट जास्त नको हा विचार प्रवाह मजबूत आहे. करोनोकाळात या विचारांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. भारतासारख्या अफाट लोक संख्या असलेल्या देशात आजही ७५ टक्याहून जास्त लोकांकडे जेमतेम २० ते २५ रुपये रोज खर्च करण्याची क्षमता आहे. (अर्जूनसेन गुप्ता समितीचा अहवाल) थोडक्यात भारतीय बाजारपेठ विकसित झालेली नाही. ती करण्याची गरज आहे. परंतु लोकांची क्रयशक्ती वाढवून बाजारपेठ मोठी करण्याऐवजी नवीन आर्थिक धोरणाचा भर हा परदेशी भांडवल, तंत्रज्ञान व परदेशी बाजारपेठेसाठी उत्पादन करुन भरघोस नफा करावा यावर असल्यामुळे लोककल्याणकारी योजनांना कात्री लावणे, सरकारचा खर्च कमी करणे हे मार्ग स्वीकारले जात आहेत. त्याचा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे.

राज्याच्या अर्थव्यवस्थेचा विचार करतांना या सर्व व्यवहाराचा विचार करावा लागतो. अर्थव्यवस्थेचा विचार करताना बहुसंख्य कष्टकरी जनतेच्या दृष्टिकोनातून हा अभ्यास करणे गरजेचे आहे. निव्वळ राष्ट्रीय सकल उत्पनांचे म्हणजे जीडीपीचे वाढते आकडे देऊन विकासाचा खरा चेहरा समोर येत नाही. नवीन आर्थिक धोरणामध्ये 'झिरपण्याच्या' सिद्धातांवर भर आहे. प्रत्यक्षात तसे घडत नाही. त्यामुळेच विकासाला मानवी चेहरा असावा असे मत माजी पंतप्रधान व नवीन आर्थिक धोरणाचे समर्थक श्री. मनमोहन सिंग हे मांडत असतात. सर्व जग भर आज वाढती विषमता, वाढती बेरोजगारी यांचा सामना सर्वांना करावा लागत आहे. एका अभ्यासानुसार जगातील १० टक्के लोकांकडे ७८ टक्के संपत्ती आहे. भारतात तर १ टक्के लोकांकडे ७३ टक्के संपत्तीचे केंन्द्रीकरण झालेले आहे. महाराष्ट्रात ही यापेक्षा वेगळे काही घडत नाही. याचे भान ठेवणे गरजेचे आहे.

**विकासाचे प्रारुप**

देश स्वतंत्र झाल्यावर झपाट्याने औद्योगिकीकरण करणे, शेतीवर अवलंबून असलेली लोकसंख्या कमी करणे हे विकासाचे प्रारुप अन्य राष्ट्राप्रमाणे स्वीकारले गेले. त्या काळातील उपलब्ध तंत्रज्ञान व तत्कालीन जागतिक अर्थव्यवस्था यांचा प्रभाव होता. त्याबरोबर जागतिक पातळीवर हेच विकासाचे प्रारुप सर्व मान्य झाले होते. आता मात्र परिस्थिती बदललेली आहे. पर्यावरणाचे संकट उभे आहे. दुसरीकडे वाढत्या

तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे विना रोजगार विकास दिसत आहे. आता तर रोजगार कमी होऊन विकास होण्याच्या शक्यता दिसत आहेत. म्हणजे जास्त उत्पादन व नफा हेच विकासाचे उद्दीष्ट आहे असे चित्र आहे. त्यामुळे मानवी विकास हा आपोआप होईल असे समजले जात आहे. परंतु ते वास्तव नाही. त्यामुळे पर्यावरणाच्या रक्षणाबरोबरच विकास म्हणजे मानवी जीवन शैली सुधारणे हे निकर्ष ठेवणे महत्वाचे राहिल. हा दृष्टिकोन महाराष्ट्राच्या अर्थ व्यवस्थेचा अभ्यास करतांना ठेवावा लागेल.

**औद्योगिक क्षेत्र**

भारतातील सर्वात औद्योगिक उत्पादनांत-औद्योगिकीकरणात पुढारलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. परंतु हा विकास फक्त नाशिक, ठाणे, मुंबई, पुणे व थोडाफार औरंगाबाद व नागपूर या शहरापुरता मर्यादित आहे. प्रत्यक्षांत १० ते ११ टक्के लोकांना रोजगार पुरविला जातो. ही संख्या अनेक वर्षा पासून वाढत नाही. महाराष्ट्र हा परदेशी गुंतवणूकीत नेहमी पहिला व दुसरा असतो व भारतीय गुंतवणूकीत देखील हीच स्थिती आहे. परंतु तरीही विना रोजगार विकास हीच परिस्थीती आहे.

त्यामुळे ग्रामीण भागांत मोठ्या प्रमाणात सरकारी नोकऱ्या हाच फायद्याचा भाग ठरत आहे. एम पी एस सी च्या परिक्षा ती देणारे विद्यार्थी यांची प्रचंड संख्या याचे लक्षण आहे.

**वाढते शहरीकरण व समस्या**

झपाट्याने होणारे शहरीकरण हा विकास प्रारुपाचा महत्वाचा भाग आहे. २०१७-१८ च्या आकडेवाडी प्रमाणे महाराष्ट्राची ४६ टक्के जनता ही शहरीभागात राहते. परंतु हे शहरीकरण म्हणजे बकालीकरण आहे. भारतातील सर्वात जास्त झोपडपट्ट्यामध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या शहरातच जास्त आहे. या मध्ये मुंबई व नागपूर ही शहरे आघाडीवर आहेत. २०११च्या जनगणनेनुसार सर्व देशांमध्ये ३८.३ टक्के जनता झोपडपट्टीत राहते. यातील ८ टक्के जनता ही मुंबईतील आहे व १.३ जनता ही नागपूर मधील आहे. त्यामुळे शहरांचा विकास योजनाबद्ध रीतीने होणे, सर्व सामान्यांना सार्वजनिक सोई सुविधा सहज पणे उपलब्ध होणे, परवडणाऱ्या घरांचे बांधकाम मोठ्या प्रमाणावर होणे ही काळाची गरज आहे. युपीएच्या काळामध्ये जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशन योजनेद्वारे मोजक्या महाराष्ट्रातील शहरांचा विकास करण्याचा प्रयत्न झाला. सध्याच्या केंद्र सरकारच्या माध्यमातून स्मार्ट सिटी योजने अंतर्गत काही प्रमुख

शहरांचा विकास करण्याचा प्रयत्न झाला. परंतु दोन्ही योजनेत सर्व सामान्य नागरिकांच्या गरजा व अपेक्षा यांच्याकडे योग्य पद्धतीने लक्ष पुरवले गेले नाही. ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांच्यासाठी सोई व सेवा हेच सुत्र अवलंबिण्यात आले. महाराष्ट्रातील वाढते शहरीकरण ध्यानांत घेता पाणी, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतून व्यवस्था इत्यादी प्रश्नांकडे विशेष लक्ष पुरविण्याची गरज आहे. वाढते शहरीकरण हे मोठे आव्हान आहे. परंतु शहरीकरण म्हणजे विकास ही संकल्पना फसवी आहे. परंतु राजकीय फायद्यासाठी भारत विरुद्ध इंडिया या पद्धतीने मांडणी करून ग्रामीण विरुद्ध शहरी असे द्वद्ध उभारण्याचा प्रयत्न केला जात आहे. श्रमिकांच्या एकजुटीसाठी तो घातक आहे. याचे भान ठेवून व्यवहार करावा लागेल.

### (महाराष्ट्र) मानवी विकास आणि निर्देशांक

कष्टकरी जनतेच्या दृष्टिकोनातून विकास मोजतांना मानवी विकास निर्देशांकाला महत्व दिले पाहिजे.

या पार्श्वभूमीवर १९९८ पासून जागतिक पातळीवर **'मानवी विकास निर्देशांक'** मोजण्याची पद्धत सुरु झाली आहे. भारत या निर्देशांकानुसार जगामध्ये १४७ व्या स्थानावर आहे. महाराष्ट्र राज्याने आपल्या राज्यातील मानवी निदेशांक मोजण्यासाठी औरंगाबाद येथे एक कार्यालय २००२ पासून स्थापन केलेले आहे. या कार्यालयाने काढलेल्या निकषानुसार १२५ तालुके मागासलेले आहेत व त्यांच्यासाठी विशेष निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. संयुक्त राष्ट्राच्या एका अभ्यासाप्रमाणे २०१८ साली भारताचा मानवी विकास निर्देशांक हा ०.६४७ इतका होता. तर केरळाचा देशात सर्वात जास्त म्हणजे ०.७७९ इतका होता. महाराष्ट्राचा ०.६९६ इतका होता. खालील दिलेल्या आकडेवारी नुसार हे स्पष्ट होईल की नंदूरबार (मानवी निर्देशांक ०.६०४) हा राज्यात सर्वात मागासलेला आहे. तर विदर्भातील नागपूर व मराठवाड्यातील औरंगाबाद वगळता इतर सर्व जिल्हे विकास क्रमात राज्यात सर्वात मागे आहेत. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भाचा विकास हा समतोल नाही हे स्पष्ट होते.

### महाराष्ट्राच्या आकडेवारीकडे पाहिल्यास खालील चित्र स्पष्ट होते

२०१७च्या आकडेवारी प्रमाणे महाराष्ट्राचा मानवी विकास निर्देशांक हा ०.७५२ ऐवढा होता. मुंबई शहर आणि लगतचा परिसर यांचा मानवी निर्देशांक हा ०.८४१ ऐवढा होता. तर नंदूरबार या जिल्ह्याचा राज्यात सर्वांत कमी म्हणजे ०.६०४ ऐवढा होता.  राज्यामध्ये मुंबई, पुणे, ठाणे या तीन जिल्ह्याचा निर्देशांक

नेहमी वाढतांना दिसतो. तर उस्मानाबाद व लातूर यांचा मात्र घसरतांना दिसत आहे. २०११-१२ च्या पाहणीनुसार नंदूरबार, जालना, धुळे आणि गडचिरोली हे मानवी निर्देशांकात मागे पडलेले दिसतात, भंडाराही त्याच यादीत आहे. नाशिक मात्र मुंबई, पुणे आणि ठाणेशी स्पर्धा करतांना दिसत आहे. महाराष्ट्राचे दर माणशी उत्पन्न हे भारतातील दर माणशी उत्पन्न पेक्षा जास्त आहे. परंतु प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र अभ्यास केल्यास किमान १६ जिल्ह्यांचे उत्पन्न १ लाखा पेक्षा कमी आहे. कोकण ज्यात मुंबईचा समावेश होतो त्याच उत्पन्न सर्वात जास्त म्हणजे दर माणशी २.२४ लाख, त्याच्या खालोखाल पुणे १.६३ लाख, नाशिक १.१२ लाख, नागपूर १.३२ लाख, औरंगाबाद विभाग ९० हजार, अमरावती विभाग ८४ हजार असे विषम चित्र दिसत आहे.

महाराष्ट्राची लोकसंख्या ११.४० कोटी असून दारिद्र रेषेखालील लोकांची संख्या १७.३५ टक्के आहे.

थोडक्यात मानवी निर्देशांकानुसार महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास केल्यास मराठवाडा व विदर्भ हे विभाग मागे पडलेले दिसतात. व त्यामुळेच विभागीय असमतोल हा महत्वाचा राजकीय व आर्थिक प्रश्न झाला आहे. या विभागांचा अनुषेश भरण्यासाठी प्रयत्न झाले. विकास महामंडळेही स्थापन झाली. परंतु अपेक्षीत परिणाम दिसत नाही. याचे कारण वर्गीय हितसंबंधात मुंबई, व पश्चिम महाराष्ट्राच्या वर्चस्वामध्ये दिसते. हे दुरुस्त करण्याची गरज आहे. परंतु हे करतांना या विभागाचे विकासांचे प्रारुप वेगळे असण्याची गरज आहे याचेही भान ठेवावे लागेल.

**विभागीय विषमतेचे आव्हान**

संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीला ६० वर्षे पूर्ण झाली आहेत. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र या मागणीसाठी संयुक्त महाराष्ट्र समिती ने तीव्र आंन्दोलन केले या समितीत प्रामुख्याने समाजवादी विचाराना मानणारे पक्ष व नेतृत्व होते. त्यामुळेच मुंबई कामगारांची का भांडवलदारांची हा संघर्ष होता. कामगारांनी प्रामुख्याने गिरणी कामगारांनी हा लढा दिला. त्यामुळे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी समाजवादाचा पाळणा सर्व प्रथम महाराष्ट्र राज्यांत हलेल अशी ग्वाही देऊन महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळ पासूनच कामगार-शेतकरी व कष्टकरी समाजास आस्वस्त करण्याचा प्रयत्न केला. सर्व जगभर त्यावेळेस समाजवादी विचारांचा दबदबा त्या वेळेस होता हे कारण महत्वाचे होते.

संयुक्त महाराष्टाची निर्मिती ही विदर्भ व मराठवाडा हे विभाग जून्या मुंबई प्रांतांला जोडून झालेली आहे. ही निर्मिती होण्याच्या काळात नागपूर कराराद्वारे विदर्भाला व मराठवाड्याला समान विकासाच्या पातळीवर आणण्याचे आश्वासन होते. परंतु ते पाळले गेले नाही. त्याचा परिणाम स्वतंत्र विदर्भाची मागणी व आंदोलन होण्यात झाला. त्याचप्रमाणे मराठवाड्यात विद्यार्थी युवकांनी १९७३ साली मराठवाडा विकास आंन्दोलन करुन या प्रश्नांकडे लक्ष वेधले. मी स्वता: या आंन्दोलनात सक्रिय होतो. १९६८ साली नवीन मुंबईची स्थापना करण्याची घोषणा व योजना आणण्यात आली. मराठवाडा जनता विकास परिषदेने या संदर्भात पुस्तिका काढून या योजनेमुळे मराठवाडा आणि विदर्भाचा विकास मागे पडेल व सर्व भांडवलाचे केंन्द्रीकरण मुंबई परिसरात होईल अशी टीका केली होती. त्याचा प्रभाव सर्व युवक व विद्यार्थ्यांवर पडला होता.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर यशवंतराव चव्हाणांच्या पुढाकाराने इबीसी योजना आली. शिक्षणाचा विस्तार झाला. मराठवाड्यात याचा फायदा घेवून मोठ्या प्रमाणावर बहुजन समाज शिक्षित झाला. परंतु औद्योगिकीकरण न झाल्यामुळे नोकरीच्या संधी मर्यादितच होत्या. त्यामुळे विद्यार्थी व युवक यांच्यात असंतोष वाढला. व त्याचा परिणाम मराठवाडा विकास आंन्दोलन होण्यात झाला. याच्या पहिल्या टप्प्यात जायकवाडी धरण १० वर्षात पूर्ण होणे, औरंगाबाद येथे विज्ञान संस्थेची स्थापना होणे, आकाशवाणी केंन्द्र होणे. एचएमटी, देवगिरी कापड गिरणी सारखे सार्वजनिक उद्योग स्थापन होणे, प्रत्येक तालुक्या व जिल्ह्याच्या ठिकाणी एमआयडीसी स्थापन होणे असे अनेक फायदे झाले. परंतु याच्याने प्रश्न सुटले नाहीत त्यामुळे घटनेत आश्वासन दिल्या प्रमाणे मराठवाडा व विदर्भाला ३७१/३ कलमा प्रमाणे विभागीय विकास महामंडळे मिळावी हे आंन्दोलन झाले. त्याचा परिणाम १९८२ साली विभागीय विषमतेचा अभ्यास करण्यासाठी श्री. दांडेकर या अर्थतंज्ञाच्या नेतृत्वाखाली समिती नेमली गेली व विभागीय अनुशेष काढण्यात येऊन तो दुर करण्याचे आश्वासन देण्यात आले व प्रयत्न ही झाला. परंतु विषमतेचा प्रश्न काही सुटला नाही. याचे कारण म्हणजे दांडेकर समितीने हुशारीने जिल्हा हा निकष न मानता तालुका हा निकष स्वीकारुन उर्वरीत महाराष्ट्रातील ४७ दुष्काळ प्रवण तालुके ही मागासलेल्या यादीत घातले. नंतर केळकर समिती स्थापन करुन परत या विषयाचा अभ्यास व अनुषेश काढण्यासाठी स्थापन झाली. तीचा अहवाल अद्याप स्वीकारण्यात आलेला नाही. त्यात अनेक त्रुटी देखील आहेत. आता नविन

आर्थिक धोरणानंतर विभागीय अस्मिता व त्यासाठी होणारे राजकारण व दबाव कमी झाला आहे. राज्यात अनेक प्रभावी राजकारणी (विषेशता: पश्चिम महाराष्ट्रातील) अनुशेष नाहीच अशी भूमिका घेत आहेत. आता तर विभागीय पातळीवर स्थापन करण्यात आलेली महामंडळे बरखास्त झाली आहेत व त्यांचे पुर्नजीवन होण्याची ही शक्यता नाही.

या पार्श्वभूमिवर महाराष्ट्र राज्याचा मानवी विकास निर्देशांक हा महत्वाचा ठरणार आहे. त्याचबरोबर विकासाचे प्रारुप विदर्भ व मरावाड्यासाठी वेगळे असण्याची गरज ही समोर येत आहे. प्रामुख्याने शेती विकास, पर्यटन विकास व त्यासाठी लागणाऱ्या पायाभुत सोई, शिक्षणाच्या मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध करुन देणे यावर भर देण्याची गरज आहे.

महाराष्ट्राच्या सध्या असलेल्या वास्तवात नाशिक, पुणे, ठाणे व मुंबई हे चार विभाग मानवी निर्देशांक, भांडवली गुंतवणूक व औद्योगिकीकरण, शिक्षण, दरडोई उत्पन्न व इतर सर्व बाबतीत उर्वरीत महाराष्ट्राच्या कितीतरी पुढे आहेत. महाराष्ट्राच्या १२ कोटी लोकसंख्यापैकी ३३ टक्के लोक या चार जिल्ह्यात राहत आहेत त्यामुळे आमदारांची संख्या व राजकीय प्रभाव हा महाराष्ट्राच्या अर्थकारणावरती मोठ्या प्रमाणावर याच विभागाचा दिसतो हे चित्र कसे बदलायचे हे मोठे आव्हान आज अर्थव्यवस्थेसमोर आहे.

**शेतकरी आत्महत्या व शेती विकासाचा प्रश्न**

१९९५ नंतर म्हणजे नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर शेतकऱ्याच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत आहेत. महाराष्ट्र राज्य हे या आत्महत्याच्या आकडेवारीत आघाडीवर आहे. त्यातही विदर्भ व मराठवाडा या विभागात मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. सर्व जग व देशभर या सातत्याने होणाऱ्या आत्महत्यामुळे महाराष्ट्रातील व देशातील शेती प्रश्नावर चर्चा होत आहे. अनेक उपाय व पॅकेज शेतकऱ्यासाठी जाहीर होत आहेत. परंतु आत्महत्या थांबत नाहीत. युपीएच्या कार्यकाळात प्रसिद्ध शेती तज्ञ श्री. स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करुन शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी काही मौलिक सुचना करण्यात आल्या आहेत. या सुचना सरकारने स्वीकाराव्यात म्हणून देशभर शेतकरी आंन्दोलन करीत आहेत. या शिवाय मोठ्या प्रमाणावर कॉर्पोरेट क्षेत्राचा प्रभाव शेती व त्याला लागणाऱ्या सर्व गरजा यांच्यावर पडत आहे. अनेक विकसित राष्ट्राप्रमाणे शेती उद्योगही कॉर्पोरेट भांडवलशाही ताब्यात घेईल ही साधार भिती शेतकऱ्यांना आहे. म्हणून गेल्या ९ महिन्यापासून केंन्द्र सरकारने घिसाडघाईने मंजूर केलेल्या

शेती कायद्या विरुद्ध आंन्दोलन होत आहे. महाराष्ट्रातही या संदर्भात असंतोष आहे.

महाराष्ट्रात ब्रिटिश काळापासून इंग्लंडमधील कापड गिरण्यांना स्वस्त दराने कापूस मिळावा म्हणून महाराष्ट्रात शेतकऱ्यांना कापूस उत्पादन घेण्यासाठी भाग पाडण्यात आले. याचा परिणाम आज महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावरती शेतकरी कापूस पिकवितो असे चित्र आहे. कापूस हे महाराष्ट्रासाठी महत्वाचे व्यापारी पीक आहे. शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा त्यांची व्यापाऱ्यामार्फत होणारी फसवणूक टाळावी म्हणून १९७६ साली कापूस खरेदी एकाधिकार योजना राबविण्यात आली होती. नवीन आर्थिक धोरणाच्या रेट्यात ती रद्द झाली आहे. परंतु आजही कापसाला मिळणारा भाव आणि होणारे उत्पादन व नवीन तंत्रज्ञान (बी. टी. कॉटन) महत्वाचे घटक ठरत आहेत. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या या प्रामुख्याने कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या आहेत. कर्ज माफी, अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा, सिंचन व्यवस्था इत्यादी मागण्या सातत्याने होत आहेत. खाजगी क्षेत्राला वाव देण्यासाठी सरकार मार्फत या मागण्या संदर्भात चालढकल होत आहे.

महाराष्ट्रातील दुसरे महत्वाचे पीक म्हणजे ऊस हे होय. प्रामुख्याने हे पश्चिम महाराष्ट्राचे पीक असले तरी मराठवाडा, विदर्भ या भागात जिथे सिंचनसोई उपलब्ध होतात तिथे ऊस लागवड करण्यावर शेतकऱ्यांचा भर आहे. याचे कारण म्हणजे खात्रीलायक उत्पन्न परंतु यामुळे पाणी उपलब्धतेचे प्रश्न निर्माण होत आहेत. हजार लिटर पाणी वापरुन ऊसकरी शेतकरी जेमतेम ३ रुपये उत्पन्न कमावतो. महाराष्ट्रातील जेमतेम १८ ते २० टक्के जमीन सिंचनाखाली आहे. सिंचनाच्या पाण्यावर ऊस घेणारा महाराष्ट्र हा अपवाद आहे. ब्राझील, क्युबा, मॉरिशस व इतर ऊस उत्पादक देशात पावसाच्या पाण्यावर ऊस पिकविला जातो. महाराष्ट्र शासनाने उसासाठी होणाऱ्या पाण्याचा वापर कमी व्हावा व शेतीला जास्त पाणी मिळावे म्हणून ऊस पिकविण्यासाठी ठिंबक सिंचनाला प्राधान्य व प्रोत्साहन दिले आहे. परंतु अद्याप त्याचा अपेक्षित परिणाम जाणवत नाही.

कापूस, ऊस, सोयाबीन इत्यादी व्यापारी पीके मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात घेतली जातात. तर दुसरीकडे यामुळे अन्न धान्य व डाळी या जीवनावश्यक पीकांचे उत्पादन कमी प्रमाणात होत आहे. महाराष्ट्र हा अन्न धान्यांसाठी आता इतरांवर अवलंबून आहे. आजही मोठ्या प्रमाणावर कोरडवाहू जमिन असल्यामुळे ज्वारी, मका, बाजरी ही पीके घेतली जातात परंतु त्यांना योग्य भाव मिळत नाही ही शेतकऱ्यांची रास्त तक्रार आहे.

महाराष्ट्राने संयुक्त महाराष्ट्र निर्मिती नंतर मोठ्या प्रमाणावर फळबागांवर लक्ष केंन्द्रीत केलेले दिसते. सर्व देशांत नागपूर-अमरावती परिसर हा संत्र्यासाठी जालना हा मोसंबीसाठी, जळगाव नांदेड हा केळ्यासाठी तर सांगोला हा डाळीबासाठी नाशिक व तासगांव हा द्राक्षांसाठी तर कोकण हा आंब्यासाठी प्रसिद्ध आहे चिकू, आवळा, बोरे इत्यादी फळे ही मोठ्या प्रमाणावर घेतली जातात व ही निश्चितच अभिमानाची व आनंदाची बाब आहे.

परंतु या फळांच्या उपलब्ध ते नंतर ही शेती उत्पादनावर आधारीत प्रक्रिया उद्योग व मोठ्या प्रमाणावर उभे राहिल्याचे चित्र नाही. या क्षेत्रांत गुंतवणूकीच्या मोठ्या संधी आहेत त्याची दखल घेण्याची आवश्यकता आहे.

थोडक्यात महाराष्ट्र राज्यात आजही ५१ टक्के लोक शेती उद्योगावर अवलंबून आहेत. १ कोटी २५ लाख शेतकरी आहेत. परंतु त्यापैकी बहुसंख्या शेतकरी हे छोटे व मध्यम शेतकरी आहेत. २ हेक्टर पेक्षा जास्त शेती असणाऱ्यांची संख्या १० ते १५ लाखाच्या आसपासच आहे. त्यामुळे छोट्या शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी सहकार आवश्यक आहे तसेच जोड धंदाही आवश्यक आहे. काही भागात दुध उत्पादन, कुकुट पालन, शेळी पालन मोठ्या प्रमाणावर झालेले दिसते परंतु राज्य पातळीवर छोट्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारचे प्रयत्न व योजना यांची गरज आहे. दुसरीकडे शेतीला पाणी मिळाल्याशिवाय उत्पादनात वाढ होऊ शकत नाही. त्यामुळे जास्तीत जास्त जमिन सिंचनाखाली कशी येईल हा प्रयत्न होणे आवश्यक आहे. विज्ञानाची मदत घेऊन, योग्य प्रोत्साहन देऊन पीक पद्धत ही बदलण्याची गरज आहे विकासाचे प्रारुप हे पर्यावरणाचे भान ठेवून शाश्वत विकास करण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. वाढत्या औद्योगकीकरणानंतर ही अपेक्षित रोजगार उपलब्ध होणार नाहीत, होत नाहीत कारण नवीन तंत्रज्ञान हे कमी माणसात जास्त उत्पादन काढणारे आहे व आजच्या काळात त्याचा स्विकार अपरिहार्य आहे त्यामुळे स्वातंत्र्या नतंर काळात पाहिलेले विकासाचे प्रारुप आज मदतकारक ठरणार नाही. नफे वाढतील परंतु अपेक्षित मानवी विकास होणार नाही. माणसासाठी विकास असतो याचे भान अर्थव्यवस्था राबविताना ठेवावे लागेल.

भारताच्या लोकसंख्येने १ अब्ज २१ कोटींचा, तर महाराष्ट्राच्या लोकसंख्येने ११ कोटी २३ लाखाचा आकडा ओलांडलेला आहे. सन २०१५-१६ च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार आजचे देशातील अन्नधान्याचे उत्पादन २५३.२

दशलक्ष टन इतके आहे. गतवर्षी हेच उत्पादन २५७.१ दशलक्ष टन इतके होते. तर, महाराष्ट्र राज्याच्या सन २०१५-१६ च्या आकडेवारीनुसार राज्यातील अन्नधान्याचे उत्पादन ८.५० दशलक्ष टन आहे. गतवर्षी हेच उत्पादन १०.९४ दशलक्ष टन इतके होते. सन २०१५-१६ च्या आर्थिक पाहणी अहवालाच्या आकडेवारीनुसार, राज्यात यंदा १.४८ दशलक्ष टन टाळी, ७.०६ दशलक्ष टन गळीतधान्य तर २.२२ दशलक्ष टन तेलबियांचे उत्पादन आले. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उसाच्या पिकातही घट झाल्याचे आकडेवारी दर्शवते.

कडधान्य आणि गळीत धान्याच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण नाही. दरवर्षी देशाला डाळीची आणि खाद्यतेलाची मोठ्या प्रमाणामध्ये आयात करावी लागते. डाळी आणि तेलबिया व इतर पोषक घटकांच्या दररोजच्या आहारातील कमतरतेमुळे कृषी व आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारताची २२ टक्के लोकसंख्या कुपोषित आहे. गरिबीवर मात करण्यासाठी शेती व शेतीशी निगडित क्षेत्रात येत्या काळात महाराष्ट्राला भरीव असे कार्य वेगाने करावे लागणार आहे.

**स्थालांतरीत कामगारांचा प्रश्न**

महाराष्ट्र राज्य औद्योगिकदृट्या पुढारलेले असल्यामुळे सर्व राज्यातून व देशातून मोठ्या प्रमाणावर स्थालांतरीत कामगार या राज्यात येतात. प्रमुख्याने पुणे, नाशिक, ठाणे, मुंबई, औरंगाबाद व नागपूर या परिसरात स्थालांतरीत कामगारांची संख्या मोठी आहे. करोनामुळे झालेल्या लॉकडाऊनच्या काळात मोठ्या प्रमाणावर या कामगारांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले गेले. २०११ च्या जनगणणेनुसार स्थलांतरीत कामगारांची संख्या ६ कोटीच्या आसपास आहे. यातील ग्रामीण भागातून शहरी भागात आलेल्या लोकांची संख्या २३ टक्के तर शहरीभागातून शहरीभागात आलेल्या लोकांची संख्या २२ टक्के आहे. आणि ३८ टक्के ग्रामिण भागातून ग्रामीण भागात स्थालांतरीत झालेले आहेत. यातील ३७.०१ हे नोकरीसाठी तर ३.६ टक्के शिक्षणासाठी २ टक्के हे व्यापारासाठी आणि बाकीच्या कामासाठी ५७ टक्के असे प्रमाण आहे. मुंबई हे नुसतेच औद्योगिक केंन्द्र नाही तर करमणूक उद्योग (बॉलीवूड) व वित्तिय केंन्द्रही आहे. देशातील बहुसंख्य बँकांचे व वित्तिय संस्थाची कार्यालये मुंबई येथे आहेत. एका अभ्यासाप्रमाणे जगातील ५०० मोठ्या कंपन्यांपैकी ४२ टक्के कंपन्यांची कार्यालये मुंबई येथे आहेत. पुणे हे शिक्षणाचे माहेर घर समजले जाते अंदाजे २ लाख विद्यार्थी शिक्षणांसाठी पुण्यामध्ये

येतात त्यातील ५० हजाराहून जास्त हे परदेशातील असतात. थोडक्यात उपलब्ध असलेल्या संधीमुळे मोठ्या प्रमाणावरती महाराष्ट्रात स्थलांतरीत लोक आहेत.

**महाराष्ट्र आणि शिक्षण व्यवस्था आणि आव्हाने**

महाराष्ट्र राज्य हे शैक्षणिक दृष्ट्या पुढारलेले समजले जाते. महाराष्ट्रामध्ये ८३ टक्के लोक साक्षर आहेत. त्यातील ८९ टक्के पुरुष आणि ७८ टक्के स्त्रीया साक्षर आहेत. महाराष्ट्रात ८४ हजार शाळा व १ हजार महाविद्यालये आहेत आणि ४५ विद्यापीठे आहेत त्यातील २३ शासकीय व २१ खाजगी विद्यापीठे आहेत. मुंबई विद्यापीठ हे जगातील सर्वात मोठे विद्यापीठ समजले जाते. २०१८-१९ च्या आकडेवारी प्रमाणे महाराष्ट्रातल्या विविध विद्यापीठात व इतर संस्थामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३९ लाख ७६१ ऐवढी होती. २०१८-१९ च्या आकडेवारी नुसार खाजगी शाळा व संस्थामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही सरकारी शाळांपेक्षा जास्त झाली आहे. सध्या महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये ९ वी ते १२ वी या कक्षामध्ये ५९ लाख २७ हजार ४५६ विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी नोंद केलेली आहे. सर्वांत जास्त शाळा पुणे जिल्ह्यात आहेत व सर्वांत कमी शाळा या भंडारा जिल्ह्यांत आहेत. शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ही २ ते ३ टक्यांच्या आसपास आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणी नुसार २०१७-१८ राज्यातील १ लाख ६ हजार ५२७ शाळांपैकी २२,४७७ या खाजगी विना अनुदानीत शाळा होत्या. २०१३-१४ च्या आकड्यांची तुलना करतानाही ११० टक्के वाढ आहे. सध्या राज्यात ८४ हजार ५० अनुदानीत शाळा आहेत. २०१३-१४ साली त्यांची संख्या ८५ हजार ५०२ इतकी होती. प्रथम या संस्थेने केलेल्या पाहणी अहवालानुसार राज्यातील नागरीक सर्व साधारणपणे आपल्या पाल्यांना खाजगी शिक्षण संस्थेत व इंग्रजी भाषेत शिक्षण देऊ इच्छितात या पाहणी नुसार महाराष्ट्र सरकारने २०१२ साली शिक्षण संस्थांसाठी जो कायदा केला त्यानंतर खाजगी शाळांची संख्या वाढली आहे. सरकारची धोरणे याला जबाबदार आहेत. असा त्यांनी आरोप केला आहे. खाजगी शाळांचा वाढीमुळे लोकांचा शिक्षणांवरील खर्च वाढला आहे.

कोव्हिड काळात सरकारवर खाजगी शिक्षणसंस्था मधील फी माफ करावी म्हणून सरकारवर दबाव वाढला आहे. '२०२१-२२ बजेट' प्रमाणे कमी लोकसंख्या असलेल्या दिल्ली सरकारने मात्र २५ टक्के खर्च करीत आहे. (अंदाजे १६ हजार ३७७ कोटी रुपये) राज्य सरकारने २००० साली राज्याच्या सकल उत्पन्नापैकी (एसडीपी) च्या ७ टक्के पैसा शिक्षणावर खर्च करु असे आश्वासन

दिले होते. प्रत्यक्षात फक्त २.४१ टक्के (२०१२-१३) खर्च करण्यात आला. शिक्षणावर मिळणारा पुर्ण निधिही कधीही खर्च केला जात नाही असे चित्र आहे. सध्या एक शिक्षकी शाळांची संख्या ३ हजार आहे. १३ हजार शाळांना विद्युत पुरवठा नाही, १४ टक्के शाळांकडे मुलींसाठी स्वच्छतागृहे नाहीत अनेक शाळांमध्ये खोल्यांची कमतरता जाणवते आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत ३५ ते ५० टक्के मुले शालेय शिक्षण पुर्ण करु शकत नाहीत. (केळकर समिती अहवाल) प्रथम संस्थेच्या एका अभ्यासानुसार ६५ टक्के मुलं (पहिली ते पाचवी या कक्षेतील) वाचू शकत नाहीत. आणि ३२ टक्के मुले साधा गुणाकार व भागाकार करु शकत नाहीत.

मानवी विकासासाठी शिक्षण व शिक्षणांच्या संधी उपलब्ध करुन देणे हे सरकारचे काम आहे. प्रचलित अर्थ व्यवस्थेत शिक्षणाकडे एक व्यवसाय व नफ्याची संधी म्हणून पाहिले जाते. त्यामुळे शिक्षणाचे बाजारीकरण व खाजगीकरण होत आहे. १९८२ साली तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्रातील शिक्षण शुल्क देऊ शकणारे विद्यार्थी कर्नाटकात खाजगी विद्यालयात जातात असे सांगुन महाराष्ट्रातही खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांना परवानगी दिली. आतातर सर्वच क्षेत्रात शिक्षणांचे खाजगीकरण झाले आहे. अमेरिके प्रमाणे शिक्षण घेणाऱ्यांना कर्ज देणे हा वित्तिय संस्थांचा एक नवीन व्यवसाय झाला आहे. या खाजगीकरणामुळे शिक्षणातील संधीची असमानता वाढत आहे व शिक्षण महाग होत आहे व सर्व सामान्याच्या आवाक्याबाहेर जात आहे. याचा विपरित परिणाम महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासावरती होणार आहे. सर्वांना दर्जेदार शिक्षण सहजपणे उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे त्यामुळे राज्य शासनाने आपल्या आर्थिक बजेटमधील किमान ६ टक्के पैसा (एस. डी. पी. च्या) खर्च करावा अशी मागणी होत आहे त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. तसेच शिक्षण हे खाजगी व नफ्यासाठी व्यवसाय करणारे केंन्द्र ठरू नये याची दक्षताही घ्यावी लागेल. शिक्षणांपासून सर्वसामान्यांना वंचित ठेवून, त्यांना राबवून घेण्याची जूनी चार्तुवर्ण पद्धत परत येण्याची भिती प्रसिद्ध विचारवंत शहीद कॉ. गोविंद पानसरे यांनी आपल्या द्विवर्णशिक्षण पद्धती या पुस्तिकेत मांडली आहे व धोक्याचा इशारा दिला आहे. आपण वेळीच सावधान होण्याची गरज आहे.

**सहकार वाचवा, सहकार वाढवा**

धनंजयराव गाडगीळ व विखे पाटीलांनी शेतकऱ्यांना बरोबर घेऊन सहकाराची मुहुर्तवेढ रोवली. पहिला सहकारी साखर कारखाना काढला व शेतकरी वर्गात

नवचैतन्य निर्माण केले. राज्यनिर्मिती नंतर मोठ्या प्रमाणावर खाजगी कारखान्याचे सहकारीकरण झाले व नवीन सहकारी खाखर कारखाने उभारले गेले. त्याच बरोबर दुग्ध महासंघाचे व सहकारी पतसंस्थेचे, सहकारी बँकाचे मोठ जाळ महाराष्ट्र राज्यात निर्माण झालें व विशेषता प. महाराष्ट्रांत त्याच्या फायदा सर्व सामन्य माणसा पर्यंत पोहचण्याचा परिणाम झाला. सहकार क्षेत्र हे महाराष्ट्रातील अर्थ व्यवस्थेचे एक प्रमुख अंग झाले व राहीले. **नविन आर्थिक धोरणाच्या रेट्याखाली** या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर घराणे शाही व भ्रष्टाचार समोर आल्यावर आज घड्याळाचे काटे उलटे फिरवले जात आहेत व सहकारी साखर कारखान्यांचे खाजगीकरण वाढत आहे व त्याच बरोबर बंद पडलेल्या साखर कारखान्यांची विक्री सत्ताधारी पक्षां मार्फत अत्यंत अल्प दरांत करुन संपती दडपण्याचे प्रकार घडत आहेत. तरीही आता अनेक साखर कारखाने सहकारी तत्वावर उभे आहेत व त्यांचा आर्थिक व राजकीय प्रभाव राज्यवरील राजकारणावर पडत आहे. सध्याच्या केंन्द्र सरकारने राज्यांत भाजप विरोधी सरकार स्थापन झाल्यावर या सहकार क्षेत्रावर अंकुश ठेवण्यासाठी हालचाली सुरु केल्या आहेत व त्यामुळेच केंन्द्रात सहकारी खाते गृहमंत्र्याचा आधीन ठेवून नवीन चाल रचली आहे.

आजच्या आर्थिक विषमतेच्या वाढ त्या काळांत, कॉर्पोरेट जगाचा विळखा अर्थ व्यवस्थेला बसत असताना, सहकार वाचविणे व वाढविणे हा त्याचा मुकाबला करण्यासाठी महत्वाचा मार्ग आहे हे चित्रपण पुढे येत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या पुढच्या अर्थकारणात सहकारी क्षेत्र हा महत्वाचा संघर्षाचा मुद्दा ठरणार आहे.

मध्यंतरीच्या काळात सहकार हा घराणेशाही, भ्रष्टाचार यामुळे बदनाम झाला व करण्यात आला. परंतु आज कॉर्पोरेटशाहीचा मुकाबला करताना व छोट्या व्यवसाईक व उद्योगांना सक्षम करतांना सहकार हा महत्वाचा घटक ठरणार आहे. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावरती सहकारांमुळे लाभ झालेल्या लोकांचा अनुभव यासाठी उपयोगी पडणार आहे. आजही महाराष्ट्रात साखर उद्योग, दुध व्यवसाय व सूत गिरणी, कॉर्पोरेटीव क्रेडिट संस्था, इत्यादींचा अनुभव आहे. त्याचा उपयोग करुन व शासनामार्फत सहकार योजनेला प्रोत्साहन देऊन महाराष्ट्रात मानवी विकास साधण्याच्या शक्यता आहेत. विशेषत: शेती व शेती उद्योग यात याचा फायदा होऊ शकतो. याचा विचार करणे हे आवश्यक आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात येणाऱ्या भविष्यात खाजगीकरणचे समर्थन करणारे व कॉर्पोरेटशाहीला विकास समजणारे, सहकार क्षेत्र उद्धवस्त करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत करीत आहेत. त्यामुळे राजकारणामध्ये एक नवीन संघर्ष उभा राहणार आहे. सर्व सामान्य जनतेने सहकाराच्या बाजूने उभे राहून

सहकार वाचवण्याची गरज आहे व तो वाढावा म्हणून कृतीशील होण्याची गरज आहे.

### इतर महत्वाचे प्रश्न

आता पर्यंत आपण, शहरीकरण व बकालीकरण, शेतकरी आत्महत्या व शेती विकास, शिक्षणाचे प्रश्न, स्थालांतरीतांचे प्रश्न व सहकार व विभागीय विषमतेचे आव्हान इत्यादी प्रश्नांचा उहापोह केला पण याच बरोबर महाराष्ट्रात इतरही महत्वाचे प्रश्न आहेत त्याचा थोडक्यात आपण आढावा आपण घेऊयात.

**सिंचनाचा प्रश्न -**

नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन पाण्याचे योग्य नियोजन करुन जास्तीत जास्त जमीन ओलीताखाली आणण्याची गरज आहे. ठेकेदार व राजकारणी यांचे साटेलोटे व भ्रष्टाचार हा यासाठी मोठा अडसर आहे त्याच बरोबर पाण्याचे समन्यायी वाटप व नियोजन आणि त्यासाठी योग्य कायदे यांची गरज आहे परंतु हे हितसंबंधीय होऊ देत नाहीत व होणार नाही त्यामुळे जन आंन्दोलनाची गरज आहे.

**बेरोजगारीचा प्रश्न -**

ग्रामीण व शहरी बेरोजगार असे याचे स्वरुप आहे. १९७१-७२ च्या दुष्काळात कामगार संघटनांच्या पुढाकाराने व्यवसाय कर लादून राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार हमी योजना राबविण्यासाठी शासनाला भाग पाडण्यात आले. पुढे २००५ साली डाव्या पक्षाच्या पुढाकाराने युपीएच्या कार्यकाळात सर्व देशात रोजगार हमी योजना राबविण्यात आली. करोनाच्या आजच्या संकटात मोठ्या प्रमाणावर या योजने द्वारे लोकांना काम मिळाले. अशाच प्रकारची योजना शहरीभागातील बेरोजगारांसाठी राबवावी अशी मागणी होत आहे. अनेक विद्यार्थी संघटना 'बनेगा' म्हणजे भगतसिंग राष्ट्रीय रोजगार योजना राबवावी म्हणून मागणी करत आहेत. विना रोजगार विकासाच्या काळात अशा योजनांचे महत्व आहे. महाराष्ट्रात उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होऊन देखील अपेक्षित रोजगार उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे असंघटित क्षेत्रात रोजगाराची वाढ होत आहे. प्रामुख्याने सेवा क्षेत्रात ही वाढ दिसते. परंतु असुरक्षित रोजगार, कुठलीही सामाजिक सुरक्षा नसणारे रोजगार, वेळेची मर्यादा नसणारे व कायद्याचे संरक्षण नसणारे रोजगार आज वाढत आहेत त्यामुळे पुर्वीप्रमाणे रोजगार मिळून मध्यमवर्गाप्रमाणे राहणीमान मिळण्याच्या शक्यता धुसर होत आहेत वाढत्या विषमतेचे हे लक्षण आहे. त्यावर उपाय शोधणे हे मोठे आव्हान आहे.

### वाढता सामाजिक तणाव

अर्थव्यवस्थेमध्ये अडचणी आल्यानंतर लोकांच्या अपेक्षाप्रमाणे विकास होत नाही. अशावेळेस सामाजिक ताण तणाव वाढतात आजच्या महाराष्ट्रात वाढती जातीय व धार्मिक अस्मिता व राखीव जागांची वाढती मागणी व त्यासाठी होणारी सातत्यापूर्ण आंन्दोलने ही या सामाजिक असंतोषाची लक्षणे आहेत. ती दूर करण्यासाठी मानवी विकासावर भर देणारी, रोजगार निर्मिती करणारी अर्थव्यवस्था अपेक्षित आहे त्यासाठी येत्या काळात प्रगतीशिल शक्तींना कष्टकरी समुदायाला बरोबर घेवून संघर्ष करावा लागणार आहे.

### राज्यावरील वाढते कर्ज

नवीन आर्थिक धोरणा नंतर तुटीच्या अर्थसंकल्पावर बंधने आली वाढती कर्जे काढून राज्य सरकारने खर्च भागवण्याचा मार्ग स्विकारला. सिंचन व्यवस्थांवर ३३१(३) प्रकरणाद्वारे, वैचारिक विकास महामंडळे स्थापन झाल्यावर मागास भागाच्या अनुशेष भरण्याच्या संदर्भात राज्यपालामार्फत बंधने आली. त्यावर मात करण्यासाठी कृष्णा खोरे विकास प्रश्न हाती घेऊन, १६ टक्के व्याज देऊन कर्ज रोखे काढण्यात आले ते १९९५ साली तेव्हा पासून कर्ज काढून काम केलं जात आहे.

२०२०-२१च्या अर्थसंकल्पाप्रमाणे कर्जाची वाढ ६ लाख पंधरा हजार एकशे सत्तर करोड रुपये ६,१५,१७० रु. करोड रुपये ऐवढी झाली आहे.

राज्याच्या सकल उत्पन्नाशी त्याचे प्रमाण २०.६७ टक्के एवढे आहे. ३० हजार करोड रुपये हे केंद्राकडून जी. एस. टीच्या भरपाई म्हणून ३१ मार्च पर्यत मिळणार होते ते न मिळाल्यास हे कर्ज काढणार आहे. या कर्ज पुरवठ्याची रक्कम परत करण्यासाठी व्याज २० हजार कोटी रुपये तर हप्ते १८ हजार कोटी अंदाजे असे दरवर्षी ३८ हजार कोटी रुपये अर्थसंकल्पातून खर्च करावे लागतात.

वाढती कर्ज जर विकास कामासाठी घ्यावी लागत असतील तर त्याचे फायदे होऊ शकतात. परंतु तशी स्थिती नाही.

राज्याचे खर्च भागविण्यासाठी कर्जे घेतली जात आहेत वा मोठ्या योजना म्हणजे समृद्धी महामार्ग, मेट्रो, योजना वा बुलेट ट्रेन हा सरकारच्या प्रकल्प स्थापने साठी! याचा दिर्घ कालीन परिणाम जाणवणारा आहे. एके काळी मजबूत अर्थव्यवस्था व शिस्त असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राच्या नावलोकिक होता तो आता संपत आला आहे.

### आरोग्य सेवा सार्वजनिक आरोग्य सेवा सुधारणे

भारताप्रमाणे आरोग्य सेवेचे मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण महाराष्ट्रात ही

होत आहे. तज्ञांच्या अभ्यासाप्रमाणे जगात सर्वात जास्त खाजगीकरण आरोग्य व्यवस्थाचे भारतात होत आहे. श्रीमंतासाठी आधिकव्यवस्था असे, स्पष्ट दिसत आहे. औषधी कंपन्या विमा कंपन्या व त्याचे फायदे कायम ठेवून मोठी खाजगी इस्पितळे निर्माण करण्याकडे कल आहे.

करोना काळांत याचे विपरित परिणाम जाणवत आहेत; व सर्व ताण हा सार्वजनिक आरोग्य व्यवस्थांवर पडला आहे. आता याचे भान ठेवून सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मजबूत करणे, ग्रामिण, शहरी भागातील उपलब्ध आरोग्य सेवामध्ये उपलब्ध होत असलेला फरक दूर करणे हे महत्त्वाचे काम ठरणार आहे. आरोग्य व्यवस्थेवर किमान १० टक्के निधी (राज्याच्या सकल उत्पन्नाच्या) खर्च करण्याची योग्य मागणी होत आहे. त्याचा विचार व्हावा व दुसरीकडे लोक सहभाग आरोग्य सेवेमध्ये वाढवावा. नगर पालिका, महानगर पालिका व इतर सार्वजनिक संस्था मजबूतीने आरोग्यसेवा देतील याची खात्री करावी. दिल्ली येथील केजरीवाल यांनी उभे केलेले, मोहल्ला क्लिनिक व इतर सुविधा यांचा विचार व अभ्यास व्हावा.

खाजगीकरण व विभागीयकरण यावरील भर कमी करून लोकांना प्रत्यक्ष सेवा पुरविण्यात शासनाने भर द्यावा ही रास्त अपेक्षा आहे.

**किनारपट्टी विकास व मासेमारी - समुद्र वाहतूक इत्यादि प्रर्यावरणाचा प्रश्न व विकास**

महाराष्ट्र राज्यात ७५० कि. मी. ची लांब किनारपट्टी आहे. मत्स्य व्यवसाय व बंदरे विकसीत करून मोठ्या प्रमाणावर रोजगार वाढविणे व उत्पन्न वाढविणे शक्य आहे. परंतु पर्यावरणाचे संतुलन सांभाळून हे काम करावे लागणार आहे विस्थापनाशिवाय, संयुक्त राज्य संघटनाने नुकत्याच आपल्या अहवालांत वाढत्या तापमानाचा, बदलत्या हवामानाच्या वाढत्या पाणी पातळीच्या धोक्याचा इशारा दिला आहे. पश्चिम घाटाच्या संदर्भात कस्तुरि रंगन व माधव गाडगीळ समितीचे अहवाल ही आले आहेत. दुसरीकडे या किनारपट्टीत राहणाऱ्या कोडींचा ही विकासा संदर्भात रास्त व वाजवी अपेक्षा आहेत. या सर्वाचे भान ठेवून शाश्वत विकास योजना या भागासाठी तयार करून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. परंतु जुने विकासाचे प्रारूप स्विकारत, मोठ्या प्रमाणावर आण्विक विद्युत प्रकल्प वा पेट्रोकेमिकल प्रकल्प आणून विकास लादून पर्यावरणाचे संकट  उभे करण्यात अर्थ नाही. कोकणाचे पर्यावरण रक्षण करून विकास हे फार मोठे आव्हान आहे.

मनुष्य केन्द्रीत विकास ही संकल्पना स्विकरूनच हा तिढा सोडविला जाऊ शकतो.

■



दादा पुरव रिसर्च
ऑण्ड ट्रेनिंग इंस्टीटयूट
: तर्फे प्रकाशित

₹ ६०/-